# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२३/०६/२०१८
## दि.२२/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे २९६/१८,भादविक ३९२,३४१,४२७,३४ |
| **फिर्यादी** | शैलेश काळभोर,वय ३६ वर्षे,रा.पिंपळे गुरव,पुणे |
| **आरोपी** | स्विफ्ट डिझायर गाडीमधील तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०६/२०१८ रोजी २१/३० वा.चे सुमारास काशिद पार्क चौक,पिंपळे गुरव नाशिक फाटया जवळ,पिंपळे गुरव,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी हे काशिद पार्क चौक,नाशिक फाटया जवळ, पिंपळे गुरव पुणे येथे त्यांचे मुळ गाव लोणी काळभोर येथुन आले असता, त्यांचे गाडीच्या पाठीमागुन आलेल्या पांढ-या रंगाची स्वीफट डिझायर गाडी चालकाने फिर्यादी यांना गाडी आडवी लावली व त्यातुन तीन अनोळखी इसम खाली उतरून त्यांनी फिर्यादी यांना लाथा बुक्यांनी मारहाण करून,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चैन १ लाख २० हजार रुपये किंमतीची जबरदस्तीने हिसका मारुन दहशत करुन चोरुन नेली तसेच फिर्यादी यांचा मोबाईल फोन फोडुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अे.बी.शेटे ७५८८०२४५१३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १२५/१८,भादविक ४५४,४५७,५११,३८० |
| **फिर्यादी** | जयराम हिंगोरानी,वय ३८ वर्षे,रा.मंगळवार पेठ पुणे, |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०६/१८ रोजी सायंकाळी ०६/०० वाजता ते दि.२२/०६/१८ रोजी सकाळी ०८/३० वाजण्याचे दरम्यान फ्रेंडस पॅलेस सोसा.२८१ मंगळवार पेठ पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे ग्रीलचा कोंयडा कशाच्या तरी साह्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख रक्कम ८ हजार ३००/- रुपये व चांदिचे दागिने असा एकुण १२ हजार ३००/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. तसेच फिर्यादी यांचे शेजारी राहणारे अमित पद्माकर डेंगळे,रा.फ्लॅट नं.१६ यांचा देखील फ्लॅट फोडण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वाय.पी.सुर्यवंशी ९४०५९५५३२६ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सांगवी पो स्टे २९८/१८,भादविक ३५४,३२४,१७०,४५१,४५२,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ४३ वर्षे,रा.सांगवी,पुणे |
| **आरोपी** | १) एक महिला,(फिर्यादी यांची मुलगी) २)संतोष भारत तायडे,वय २४ वर्षे,रा.आंबेडकरनगर, विक्रोळी, मुंबई, (अ.क्र.२ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. २२/०६/२०१८ रोजी १४/३० वा.चे सुमारास नवी सांगवी,पुणे. |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची बहीण व फिर्यादी हया त्यांचे राहते घरी असताना, फिर्यादी यांची मुलगी व संतोष तायडे असे फिर्यादी यांचे घरात घुसुन, फिर्यादी यांना "तुला बघुन घेते" अशी धमकी देवुन, लाकडी दांडक्याने उजव्या तळहातावर मारहाण करुन, फिर्यादी यांचे मुलीबरोबर आलेल्या अनोळखी इसमाने मी पी.एस.आय. आहे असे सांगुन,फिर्यादी यांना शिवीगाळ करुन, फिर्यादी यांचा हात धरुन, फिर्यादी यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.ए.निकुंभ ९९२३६०४५१४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**